**वाचा** - १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक माशाअ-२००९/(५९९/०९) माशि-१ दि.२० जुलै २००९.
२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक माशाअ-२००९/(५९९/०९) माशि-१ दि.१५ नोव्हें २०११.
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संकीर्ण-२०१२ (१५०/११२) माशि-१ दि.१६ जुलै २०१३.
४) शासन निर्णय क्रमांक माशामु- २०१६/(११/१६)/२०१६एसएम-४ दिनांक १ जुलै २०१६.

---

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/माध्य/शावतु/अनुघो/१६/ ४५८१
पुणे दिनांक /०७/२०१६

**आदेश** --

उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ व ३ चे शासन निर्णय तसेच संदर्भ क्र. ४ नुसार पुणे जिल्हयातील अनुदानास पात्र ठरलेल्या माध्यमिक शाळांतील विनाअनुदानित जादा तुकडया / ५ वी ते ७ वीचे प्रथम वर्ग अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेले आहेत. यामधील अनुदानासाठी विहित केलेले निकष मुल्यांकन पध्दती पुर्ण करीत असलेल्या शाळेतील वर्गांना त्यांच्या नावासमोर नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे पदे शासन निर्णयातील खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन अनुदानास पात्र घोषित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संस्थचे व शाळेचे नाव | माध्यम | तुकडी / वर्ग | क्षेत्र | अनुदानास पात्र ठरलेली पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रशिक्षीत अपदवीधर | प्रशिक्षीत पदवीधर | एकुण पदे |
| १ | रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे राजा शिवछत्रपती विदयालय तळवडे ता.हवेली जि.पुणे | मराठी | इ.५ वी ते ७ वी प्रथम वर्ग | बिगर आदिवासी | ३ | १ | ४ |

**अटी व शर्ती** -

१) प्रपत्र-अ आणि प्रपत्र -ब मध्ये नमूद केलेल्या शाळांनी शासन निर्णय दि.१५ नोव्हेबर २०११ व दिनांक १६ जुलै २०१३ मधील सर्व निकष व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) सर्व शाळांचे जिल्हा शैक्षणिक प्रणालीवरील (यु-डायस) क्रमांक आणि शाळेत शिकत असलेल्या विदयार्थ्यांच्या आधारकार्ड क्रमांकाच्या आधारे विदयार्थी संख्या ग्राहय धरण्यात येईल.

३) शाळेमधील सर्व शिक्षकांच्या आधारकार्डची यादी व वैयक्तिक मान्यतेचे आदेश सरल प्रणालीत भरल्याशिवाय कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. विदयार्थ्यांच्या आधारकार्डवर आधारीत विदयार्थी संख्येनुसार शिक्षक पदे देय राहतील.

४) शासनाच्या प्रचलित नियमानुसार सर्व शाळांनी मूलभूत सुविधांबाबतची पूर्तता करणे बंधनकारक राहील. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार Non Performing / Under Performing / Non Complaince शाळा विहित पध्दतीने बंद करणे अपेक्षीत असल्याने, शाळा, वर्ग/ तुकडया अनुदानास पात्र ठरल्या असल्या तरी, त्यांनी वरील निकषांची पूर्तता करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

५) सदर आदेशान्वये शाळा / तुकडया मूल्यांकनात पात्र म्हणुन घोषित करण्यात आली असली तरी त्यास अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. संबंधित शाळांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार आहे. सदर अनुदानपात्र शाळांना जेंव्हा अनुदान सुरु करावयाचे असले त्या वेळेचे अनुदान सूत्र त्यांना लागू राहील व ते निधीच्या उपलब्धतेनुसार अदा केले जाईल. सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागु होणार नाही किंवा निधी उपलब्ध होईपर्यंतचा फरक अनुज्ञेय असणार नाही. ज्यावेळी अनुदान मंजूर होई ल त्या शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेनुसार मंजूर असलेल्या पदांनाच सदर अनुदान अनुज्ञेय राहील.

६) ज्या शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विदयार्थी पटसंख्या ३० पेक्षा कमी असेल तसेच डोंगराळ व दुर्गम भागातील शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विदयार्थी पटसंख्या २० पेक्षा कमी असेल, परंतू शाळेतील एकूण विदयार्थी संख्या २० पेक्षा अधिक असेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही व त्या शाळा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

७) ज्या शाळांमध्ये शेवटच्या वर्गात विदयार्थी पटसंख्या ३० पेक्षा कमी असेल परंतु, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक २८ ऑगस्ट २०१५ मधील तरतूदीनुसार कमी पटसंख्येच्या कारणाने बंद करण्याच्या निकषापेक्षा अधिक विदयार्थी संख्या असेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. अशा शाळा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

८) ज्या शाळेतील शेवटच्या वर्गातील विदयार्थी पटसंख्या ३० पेक्षा जास्त असेल व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पद भरती [illegible] पालन केलेले नसेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही व अशा शाळा स्वयं-

करण्यात याव्यात व त्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करण्यात यावे, मात्र अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय होणार नाही.

१०) वरीलप्रमाणे शाळा बंद होण्यापूर्वी सदर शाळेस अनुदान सुरु झाले असल्यास त्या शाळेतील शिक्षकांना शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे इतर शाळांमध्ये समायोजित करण्यात येईल.

११) शासकीय/ खाजगी अनुदानित शाळेत अतिरिक्त ठरलेले शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी सदरहू शाळांना सामावून घेणे बंधनकारक राहील. सदरहू शाळांमधील शिक्षक भरती सेवाप्रवेश विषयक प्रचलित नियमानुसार करणे बंधनकारक राहील.

१२) अनुदानाचा पुढील टप्पा केव्हा लागू करावा याबाबत संभ्रम राहू नये व राज्यात सर्व जिल्हयात याबाबत अंमलबजावणीत एकवाक्यता राहावी म्हणून स्पष्ट करण्यात येते की, शासन वेळोवेळी उपलब्ध होणारी आर्थिक संसाधने व राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन अनुदानाचा पुढील टप्पा केंव्हा लागू करायचा किंवा लागू करायचा की नाही याबाबत त्यावेळेची आर्थिक संसाधने, आर्थिक स्थिती तपासून निर्णय घेईल.

१३) शासनाचा स्वेच्छाधिकार :- अनुदानासाठी शाळा पात्र झाली म्हणजे त्या शाळेस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित शाळांना अनुदान लागू करणे हा शासनाचा **स्वेच्छाधिकार** असुन निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र शाळांना अनुदान लागू करील. सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागू केले जाणार नाही. तसेच, शाळांना विना अनुदान तत्वावर कोणत्याही शैक्षणिक वर्षात मान्यता दिलेली असली तरी, शासन वेळोवेळी उपलब्ध होणारी आर्थिक संसाधने व राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन अनुदानाच्या सुत्रात बदल करील व ज्या शाळांना अनुदान सुरु करण्यात आलेले नाही, त्या शाळांना जेव्हा अनुदान सुरु करावयाचे असेल त्यावेळेचे अनुदान सूत्र त्यांना लागू राहील.

**( हरुन आतार )**
शिक्षणाधिकारी (माध्य)
पुणे जिल्हा परिषद पुणे

प्रति, अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,
रुपीनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे राजा शिवछत्रपती विदयालय तळवडे ता.हवेली जि.पुणे

**<u>प्रत माहिती व कार्यवाहीस सादर</u> - -**

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-०१
२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१
३) अधीक्षक, माध्यमिक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-१.